सोबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/एमसीएम/२०२२-२३/२०६, दि. ०५/०८/२०२२

---

क्र. २/विकामुं/तंशि/एमसीएम/२०२२/ 2794

**सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग,
वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ /२६४७ १६१९

दि. 17 AUG 2022

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

सर्व व्यावसायीक संस्थांचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता
मान्यताप्राप्त पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था

सर्व संबंधित व्यावसायिक संस्थांना कळविण्यांत येते की, सोबतचे मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे दि. ०५/०८/२०२२ च्या पत्राचे अवलोकन करावे. अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांची गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यांत आलेले आहे. त्यानुसार संदर्भीय दि. ०५/०८/२०२२च्या पत्रामध्ये मेरिट कम मिन्स शिष्यवृत्ती योजनेची (Merit-cum-means योजनेसाठी) सविस्तर माहिती सदर पत्रामध्ये देण्यात आली असून सदर योजनेसाठी आवश्यक असलेली उत्पन्न मर्यादा विद्यार्थ्यांना योजनेचा मिळणारा लाभ तसेच सदर योजनेचा लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची मुदत व विद्यार्थ्यांनी अर्ज भरल्यानंतर संस्थांनी सदर अर्ज मंजूर करण्याचा अंतिम दिनांक याबाबतचे वेळापत्रक देण्यांत आले आहे. त्यानुसार संस्थांनी सदर योजनेचा लाभ मिळण्याकरिता पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती होण्याच्या अनुषंगाने संस्थेच्या दर्शनीभागी सूचना लावावी तसेच संस्थेच्या संकेतस्थळावरही याबाबतची माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर पत्राच्या शेवटी दिलेल्या महत्त्वाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. त्यामुळे संस्थांनी विद्यार्थ्यांचे अर्ज संस्था लॉगिनमध्ये प्रलंबित न ठेवता दिलेल्या मुदतीत एनएसपी पोर्टलवर (www.scholarships.gov.in) पुढील कार्यवाहीसाठी फॉरवर्ड करावा. संस्थेकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये कोणताही अर्ज ऑनलाईन तपासणी करण्यासाठी शिल्लक राहिल्यास याबाबतची जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

(जितेंद्र रा. निखाडे)
सहाय्य संचालक (तां.)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत :मा. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१यांना माहितीकरिता सविनय सादर

D:\MANKAR1\MKB\EBC\1Word\Covering Letters.Docx

